**चैतन्य आढाव, अजय कुंभार**
mtedit@timesofindia.com

# शेतीमधील समृद्धीचा विरोधाभास

आर्थिक पाहणी अहवालानुसार, यंदा एकूण कृषी उत्पादनात वाढ झाली असली तरी शेतकऱ्यांच्या 'निव्वळ उत्पन्नात' तितकी वाढ होताना दिसत नाही. उत्पादनात बंपर वाढ झाली की बाजारभाव पडतात आणि शेतकऱ्याच्या हाती तोकडा नफा येतो, हा 'समृद्धीचा विरोधाभास' आपण दरवर्षी अनुभवतो. आजच्या '**शेतकरी दिना**'च्या निमित्ताने लेख...



संपूर्ण भारतात २३ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राची सद्य आर्थिक परिस्थिती आणि भविष्यातील आव्हाने अधोरेखित करणेही महत्त्वाचे ठरते. जून ते ऑक्टोबर या कालावधीत राज्यात पावसाची सरासरी १०७५.३ मिमी होती आणि ऑक्टोबरअखेर हा आकडा ११७२.७ मिमीपर्यंत पोहचला. यंदा राज्याने सरासरीच्या ११७ टक्के जास्त पाऊस अनुभवला. यंदाच्या मान्सूनमुळे राज्यभरात पेरणीखाली असलेल्या एकूण क्षेत्राच्या जवळपास एक तृतीयांश क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले. याचा थेट परिणाम खरीप उत्पादनावर झाला. बदलते हवामान, सातत्याने होणारी पीक, जीवित व वित्त हानी आणि बातम्यांममध्ये झळकणारे हतबल शेतकरी हे चित्र राज्याला नवीन राहिलेले नाही.

मुळात आकडेवारीत जरी महाराष्ट्राची शेती भरघोस उत्पादन देणारी दिसत असली तरी शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न मात्र कायम आहेत. महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राकडे पाहताना प्रामुख्याने दोन विरोधाभास आढळतात. पहिला म्हणजे - महाराष्ट्राच्या 'आर्थिक पाहणी २०२४-२५'च्या अहवालानुसार, कृषी व संलग्न क्षेत्राचा विकास दर तब्बल ८.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे. हा आकडा कितीही सुखावह असला तरी राज्याच्या एकूण 'स्थूल राज्यांतर्गत उत्पादनात' कृषिक्षेत्राचा वाटा फक्त ११-१२ टक्क्यांवर स्थिरावला आहे. दुसरे म्हणजे आजही राज्याची ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहे. परिणामतः एकूण उत्पादनात कमी वाटा आणि शेतीवर लोकसंख्येचा असलेला जास्त भार हे असंतुलन आपल्या कृषी अर्थव्यवस्थेचे मुख्य दुखणे आहे. तसेच एनएसओच्या २०१९च्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे दरडोई मासिक उत्पन्न फक्त ११,४९२ रुपये (वर्ष २०१९) एवढे आहे. हे देशस्तरावरील सरासरीपेक्षा जास्त असले तरी महागाई लक्षात घेता समाधानकारक मुळीच नाही.

आर्थिक पाहणी अहवालानुसार, यंदा एकूण कृषी उत्पादनात वाढ झाली असली तरी शेतकऱ्यांच्या 'निव्वळ उत्पन्नात' तितकी वाढ होताना दिसत नाही. मुळात कृषी व्यापार शर्ती आजही शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत का? हा यक्षप्रश्न आहे. कापूस आणि ऊस ही विदर्भ-मराठवाड्याची मुख्य नगदी पिके आहेत. उत्पादनात बंपर वाढ झाली की बाजारभाव पडतात आणि शेतकऱ्याच्या हाती तोच तोकडा नफा येतो, हा 'समृद्धीचा विरोधाभास' आपण इतर पिकांबाबतही दरवर्षी अनुभवतो. एकूण ऊस उत्पादनात यंदा ६.६ टक्क्यांची घट अपेक्षित आहे, याचे परिणाम पश्चिम महाराष्ट्रातील साखरेच्या अर्थकारणावर आणि दूरतः इथेनॉल निर्मितीवर भविष्यात दिसतील. राज्यात मक्याचे भाव सध्या कमीच आहेत. मका उत्पादन वाढले असले तरी इथेनॉलसाठी मागणी कमी झाली आहे. अशा परिस्थितीत राज्यशासनाला इथेनॉल निर्मितीबरोबरच मागणी आणि पुरवठा गणितानुसार नव्याने धोरण आखावे लागेल.

जास्तीच्या पावसामुळे यावर्षी राज्यात भूजल पातळी समाधानकारक आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अहवालानुसार, राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत पाणी पातळीत वाढ झाली आहे. मात्र, लातूर, धाराशिव आणि सोलापूरसारख्या काही 'अति-शोषित' पाणलोट जिल्ह्यांमधे आजही चिंताजनक स्थिती आहे. नवीन वर्षात भूजल पातळीनुसार पिकांची लागवड करणे महत्त्वाचे आहे. ज्या प्रदेशात भूजलपातळी समाधानकारक आहे, तिथे ऊसासारखी जास्त पाणी लागणारी पिके घेणे फायद्याचे ठरते. परंतु, ज्या प्रदेशात शेती ही पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे, तिथे मात्र पीकनियोजन हा महत्त्वाचा निर्णय ठरतो. 'अटल भूजल' योजनेसारख्या उपक्रमांतून आता केवळ पाण्याचे पुनर्भरण नव्हे, तर 'पाण्याचा ताळेबंद' (वॉटर बजेटिंग) करणे ही काळाची गरज आहे.

सध्या आपण रब्बी हंगामाच्या मध्यावर आहोत. राज्यात ज्वारी, हरभरा, गहू, करडई व मक्याची पेरणी सुरू आहे. ज्वारी वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. गहू वाढीच्या ते मुकूटमुळे फुटण्याच्या अवस्थेत आहे. हरभरा वाढीच्या व फांद्या फुटण्याच्या अवस्थेत आहे आणि सूर्यफुल आणि तीळ ही पीके रोपवाढीच्या अवस्थेत आहेत. यंदाच्या रब्बी हंगामासाठी जमिनीत ओलावा चांगला आहे आणि राज्यात थंडीही बऱ्यापैकी आहे, त्यामुळे हरभरा आणि गव्हाचे उत्पादन विक्रमी होण्याची शक्यता आहे. परंतु, हवामान बदलाचे संकट टांगत्या तलवारीसारखे असते. येणाऱ्या वर्षी फेब्रुवारी-मार्च मध्ये तापमानात अचानक वाढ झाल्यास 'हीट स्ट्रेस'मुळे गव्हाच्या दाण्यांचे वजन कमी होऊन त्याचा परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. 'एल निनो' आणि 'ला निना' चा संभाव्य प्रादुर्भाव टाळण्यासाठी पीकपद्धतीत जलवायुपरिवर्तनानुसार बदल करणे महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा वारंवार होतात, पण जमिनीवरील वास्तव आजही वेगळे आहे. महाराष्ट्रात एका बाजूला बागायती शेतकरी (पश्चिम महाराष्ट्र) आणि दुसऱ्या बाजूला कोरडवाहू शेतकरी (विदर्भ-मराठवाडा) अशी उत्पन्नाची मोठी दरी आहे. शेतमजुरीचे वाढते दर, खतांच्या किमती आणि यांत्रिकीकरणाचा खर्च वजा जाता, निव्वळ नफा शेतकऱ्यांच्या हाती लागत नाही. अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी अशा परिस्थितीला जास्त बळी पडतात. हमीभाव हा केवळ कागदावर न राहता, तो बाजारातील प्रत्यक्ष व्यवहाराचा आधार बनण्यासाठी 'भावांतर भुगतान' सारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या बऱ्याच योजनांविषयी व्यवस्थित माहिती आजही पोहोचत नाही, हे वास्तव देखील नाकारता येणार नाही. सौरसिंचनासाठी राज्यात 'कुसुम' योजनेसारखे उपक्रम राबविणे कौतुकास्पद आहे. तसेच ई-नाम (इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केट) ही शेतकऱ्यांच्या हक्काचे संरक्षण करणारी योजना आहे. यांसारखे शेती सोपी करणारे जास्तीत जास्त उपक्रम राज्यशासाने राबवावेत.

सततचे पिकांचे नुकसान आणि त्यासाठी दिली जाणारी कर्जमाफी हा शेतीवृद्धीसाठी एकमेव पर्याय असू शकत नाही. शेतकऱ्यांना केंद्रस्थानी धरून शेतीत सकारात्मक, मूलभूत आणि दूरगामी उपाययोजना असणारे शासनधोरण आखणे महत्त्वाचे आहे. यासाठी जास्तीत जास्त शेतकरी आणि कृषिसंशोधक हे कृषिप्रश्नांसाठी सातत्याने एका व्यासपीठावर यायला हवेत आणि याचे रूपांतर संक्षिप्त धोरणनिर्मितीत व्हायला हवे. शेतकऱ्यांना 'डिस्ट्रेस सेल' (अडचणीत विक्री) करण्यापासून वाचवण्यासाठी 'गाव तिथे गोदाम' ही संकल्पना राबवावी लागेल. मूल्यसाखळी विकास आणि प्रक्रिया उद्योगांचे जाळे तालुका स्तरावर मजबूत करणे गरजेचे आहे. कांदा किंवा साखरेवरील निर्यातबंदीचे निर्णय तडकाफडकी घेतल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात आपली विश्वासार्हता कमी होते आणि त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. यासाठी निर्यात धोरणात दीर्घकालीन सातत्य हवे. शेतीला जोड म्हणून दुग्धव्यवसाय व मत्स्यपालनालाही तितकेच महत्त्व देणे गरजेचे आहे. येणाऱ्या दशकात हे जोडव्यवसायाच शेतकऱ्यांना उत्पन्नाची हमी देणारे ठरतील. उन्हाळ्यात पीकपाण्याची व्यवस्था करण्यासाठी आत्ताच नियोजन करणे महत्त्वाचे आहे. गावपातळीवर पाणीसाठा आणि त्यासाठी शेततळे आणि बंधाऱ्यांची पुनर्बांधणी तसेच छोट्या नद्या-ओढ्यांचे पुनरुज्जीवन देखील वेळेवर करावे लागेल.

आजचा 'राष्ट्रीय शेतकरी दिन' साजरा करताना, फक्त उत्पादन वाढीचे विक्रम नको, तर उत्पन्नाची हमी सुद्धा हवी. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्था वाढीचा दर ८.७ टक्के असणे ही आनंदाची बाब आहे, पण जोपर्यंत हा विकासदर शेतकऱ्याच्या खिशात 'आर्थिक स्थैर्य' म्हणून परावर्तित होत नाही, तोपर्यंत आकडेवारीचा हा खेळ अपूर्णच राहील. तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि निसर्ग या तिघांची सांगड घालणारा 'स्मार्ट शेतकरी' आणि त्याला पाठबळ देणारे 'सकारात्मक स्थिर सरकारी धोरण' हेच महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्याचे गमक आहे.

**(लेखकद्वय गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे येथे कार्यरत आहेत.)**